# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १८५-२३** **दिनांक ०९/०६/२०२३**

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तलाय चालक पोलीस शिपाई व पोलीस शिपाई भरती सन २०२१ प्रक्रियेमध्ये बनावट कागदपत्र सादर करणाऱ्या आणखी ०५ उमेदवारांवर काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हे दाखल.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे सर्व पोलीस घटकामध्ये चालक पोलीस शिपाई व पोलीस शिपाई भरती सन २०२१ प्रक्रीया राबविण्यात आली आहे.

त्यादरम्यान पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे आस्थापनेवर पोलीस भरतीमध्ये उमेदवरांनी प्रकल्पग्रस्ताचे बनावट प्रमाणपत्र सादर केल्याचे पडताळणीदरम्यान आढळुन आल्याने मा. पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाकडून मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत घेण्यात आलेल्या पोलीस भरती प्रक्रीया २०२१ मध्ये पोलीस शिपाई पदाकरीता प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त या समांतर आरक्षणांतर्गत निवड झालेल्या उमेदवारांचे प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबत निर्देश दिल्याने मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर नमुद समांतर आरक्षणाअंतर्गत तात्पुरत्या निवड यादीत समावेश झालेल्या उमेदवारांचे प्रमाणपत्राची पडताळणी करणेकामी मा. पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि. कार्यालयामार्फत विशेष पथक स्थापन करण्यात आले होते.

उमेदवारांच्या प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रांची पडताळणी करून बनावट प्रकल्पग्रस्ताचा दाखला हा खरा असल्याचे भासवून फसवणुक केल्याप्रकरणी काशिमीरा पोलीस ठाण्यात यापुर्वी ०५ उमेदवारांविरुध्द प्रत्येक ०१ याप्रमाणे ०५ गुन्हे दाखल असून आणखी ०५ उमेदवार नामे (१) श्री आकाश आत्माराम डोईफोडे, (२) श्री राहुल एकनाथ राठोड, (३) श्री श्रीकांत हनुमंत नवले, (४) श्री विशाल विष्णु वाघमोडे आणि (५) श्री राहुल बबन पवार चेस्ट क्रं. २८९२४ यांनी बनावट प्रमाणपत्र सादर केल्याबाबत त्यांचेविरुध्द काशिमीरा पोलीस ठाण्यात खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. काशिमीरा पोलीस ठाणेत एकुण १० गुन्हे खालीलप्रमाणे दाखल करण्यात आले आहे.

१. काशिमीरा पोस्टे गु.रजि.नं. ४०७/२०२३ भा.द.वि.सं.४१९,४२०,४६५,४६६,४६८,४७१,४७४,३४.
२. काशिमीरा पोस्टे गु.रजि.न. ४०८/२०२३ भा.द.वि.सं. ४१९,४२०,४६५,४६६,४६८,४७१,४७४,३४.
३. काशिमीरा पोस्टे गु.रजि.न. ४०९/२०२३ भा.द.वि.सं. ४१९,४२०,४६५,४६६,४६८,४७१,४७४,३४.
४. काशिमीरा पोस्टे गु.रजि.न. ४१०/२०२३ भा.द.वि.सं. ४१९,४२०,४६५,४६६,४६८,४७१,४७४,३४.
५. काशिमीरा पोस्टे गु.रजि.न. ४११/२०२३ भा.द.वि.सं. ४१९,४२०,४६५,४६६,४६८,४७१,४७४,३४.

मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाच्या तपास करणेकामी विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे.

----oooo----